Dr. PanjabraoDeshmukhKrishiVidyapeeth, Akola
## Agriculture Research Station
Tharsa,Tq. Mouda, Dist. Nagpur- 44110

**Dr. D.D. Mankar**
Associate Professor (CAS)(Agronomy)&
Officer In-charge

E-mail(O) : arstharsa1910@gmail.com

No.ARS/Estt/208 / 2022

Date- 09/06/2022

To,

Icharge,
ARIS Cell,
Dr.PDKV,Akola.

Subject- Regarding Publication of the Auction notice of Dead Stock on Universtiy Website.

Sir,

Please find enclosed herewith Auction notice of Dead Stock.

Please publish it on the university website for wider publicity.

Officer Incharge
Agriculture Research Station
Tharsa, Dist. Nagpur.

Officer-Incharge
Agriculture Research Station
Tharsa, Dist:Nagpur

# लिलाव सुचना

कृषि संशोधन केन्द्र या कार्यालयाचे भांडारातील निरूपयोगी, दुरुस्त न होण्याजोगी लाखंडी शेती अवजारे, मशिनरी, प्रयोगशाळा साहित्य, व लाखडी भंगार साहित्याचा जाहिर लिलाव दि. २०.०६.२०२२ सोमवार रोजी दुपारी ठीक १.०० वाजता कृषि संशोधन केन्द्र,तारसा येथील कार्यालयात करण्यात येणार आहे.तरी सदर लोखंडी शेती अवजारे, मशिनरी, हवामान शास्त्र साहित्य व लाखडी भंगार साहित्य ज्यांना विकत घ्यावयाचे असतील त्यांनी लिलावच्या वेळी लिलावच्या अटी व शर्ती मान्य असल्यास अनामत रक्कम रू.२०००/- भरून नोंदणी करावी. सोबत आधार कार्ड प्रत सादर करावी. कार्यालयीन वेळेत साहित्य पाहावयास मिळतील. सदर नियम अटी व शर्ते विद्यापिठाच्या www.pdkv.ac.in या संकेत स्थाळावर उपलब्ध आहेत.

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केन्द्र, तारसा
Officer Incharge
Agriculture Research Station
Tharasa, Dist.-Nagpur.

## लिलावाच्या अटी व शर्ती.

१. लिलावात निघालेले भंगार वस्तू, अवजारे व सयंत्रे यांचे लिलाव जसे आहे जिथे आहे या तत्वावर होईल.
२. जुन्या भंगार साहित्याचा लिलावात समावेश असुन त्याचा लिलाव करण्यात येईल.
३. ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी बोली सुरु होण्याआधी रु. २०००/- रोखीने भरणा करावे. तसेच दुपारी १.०० वाजता नंतर कुठलीही अनामत रक्कम स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
४. ज्यांनी अनामत रक्कम दुपारी १.०० वाजता च्या आत भरली असेल त्यानाच बिडर नंबर देण्यात येईल व त्यांनाच लिलावाच्या ठिकाणी आधार कार्डच्या झेरॉक्ससह हजर राहता येईल व लिलावात भाग घेता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावात भाग घेता येणार नाही.
५. लिलाव समितीचे सदस्य व संबंधीत कार्यालयीन कर्मचारी लिलावाचे ठिकाणी उपस्थित राहू शकतील.
६. लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल त्यांना लिलावाची बोली म्हणुन मान्यता देण्यात येईल व त्या बाबतचा अंतिम निर्णय गठीत केलेल्या समितीच्या मंजुरीनंतर ही बोली मान्य अथवा अमान्य असल्याचे जाहीर करण्यात येईल.
७. अपेक्षित किमंत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे अथवा न करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहिल.
८. साहित्य बोली कायम झाल्यास सदर वस्तूंच्या किंमती कायम झाल्यास किंमतीच्या ५० टक्के रक्कम

त्याच दिवशी व उर्वरित ५० टक्के लिलाव अंतिम झाल्यापासुन तीन दिवसात भरावी लागेल.रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.

९. बोली कायम झाल्यास संबंधीत व्यक्तिनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहुन नेण्याची त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्यांची स्वत:ची असेल.

१०.लिलाव झालेल्या साहित्याची पुर्ण किमंत भरल्यानंतर सदर वस्तू खरेदीदाराने ३ दिवसाच्या आत विद्यापीठ परिसरातून स्वत:च्या ताब्यात घ्यावी अन्यथा सदर साहित्याची देखभालीची व गाहाळ झाल्यास विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

११.ज्यांची बोली अमांन्य ठरली असेल त्यांना अनामत रक्कम परत करण्यात येईल.

१२.साहित्याची वाहतुक करतांना विद्यापीठातील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी खरेदीदाराची असेल.

१३.लिलावाबाबत काही तक्रार असल्या त्याच दिवशी तशी लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी. अन्यथा तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. . लिलावात सहभागी नसलेल्या व्यक्तीची तक्रार स्विकृत करण्यात येणार नाही.

१४.लिलावात काही अडचण अथवा वादविवाद उत्पन्न झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतिम आणि सर्वानाच बंधनकारक राहील.

१५.लिलावातील लोखंडी अवजारे, मशिनरी व लोखंडी साहित्य लिलावाच्या दिवशीपर्यंत पाहण्यास खुली राहतील.

१६.लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखुन ठेवला आहे.

१७.लोखंडी साहित्य विक्रीची बोली प्रति क्विंटल दराप्रमाणे राहील. यामध्ये टिन पत्रे इतर पातळ लोखंडी साहित्याचा समावेश राहील. सदर वजनाप्रमाणे दराची बोली करीता अंदाजे २० क्विंटल लोखड गृहीत धरण्यात येईल.पण प्रत्यक्ष रक्कम अंतीम वजन परिमाणानुसार भरावी लागेल.सदर साहीत्य उचल करणे,हमाली व वाहतुकीची जबाबदारी घेणा-याची राहील. तसेच वनज करणेची व त्यासाठी खर्चाची जबाबदारी सुद्धा राहील.

Officer Incharge
...iculture Research Station
Tharasa, Dist.-Nagpur.